सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधीक्षक कार्यालय, ठाणे ग्रामीण
एअर मार्शल हेमंत चिटणीस मार्ग, कोर्ट नाका, खारकर आळी, पोलीस स्कुल समोर ठाणे पश्चिम-४००६०१,
E-MAIL ID –lcb.thane.r@mahapolice.gov.in दूरध्वनी क्र. ०२२-२५३४३५६७

---

प्रेस नोट क्र. ०८ दि. २४.०२.२०२६

# मुरबाड घरफोडी चोरी गुन्हयाचा पर्दाफाश

## स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीणकडून आरोपीतांच्या मुसक्या आवळत चोरीस गेलेली २२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन हस्तगत

----------ooooo----------

श्री रविंद्र दत्तु जोशी, वय ६२ वर्षे, यांचा मुरबाड तालुक्यातील तुळई बादनपाडा याठिकाणी फार्महाऊस असुन दि.१८.०२.२०२६ रोजी श्री रविंद्र जोशी हे वरील ठिकाणी फार्महाऊसवर येवुन दिवसभर फार्महाऊसची साफसफाई केली. त्यानंतर रात्री २२:०० वा.चे सुमारास त्यांचे जवळील ओप्पो कंपनीचा मोबाईल फार्महाऊस मध्ये चार्जीगला लावुन गळयातील सोन्याची चैन फार्महाऊसमधील कपाटात ठेवुन झोपेत असतांना रात्रीच्या वेळी फार्महाऊस मधील मोबाईल,सोन्याची चैन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन चोरुन नेली. त्यासंदर्भात दि.२०.०२.२०२६ रोजी श्री रविंद्र जोशी समक्ष मुरबाड पोलीस ठाण्यात येवुन तक्रार दिली. त्यांनी दिलेल्या तक्रारी वरुन मुरबाड पो. ठाणे गुन्हा रजि. नं. १९५/२०२६ भा.न्या.सं कलम ३०५ (अ), ३३१(३)(४) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

मा.श्री.डॉ.डी.एस स्वामी, पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी गुन्हयांचे गांभीर्य लक्षात घेवुन स्थानिक गुन्हे शाखा, ठाणे ग्रामीण यांना दाखल गुन्हयाचा समांतर तपास करुन गुन्हा उघडकीस आणनेबाबत आदेश देवुन मार्गदर्शन केले. त्याप्रमाणे श्री.संदिप गिते,वरीष्ठ पोलीस निरीक्षक,स्थागुशा यांनी अधिनस्त अधिकारी/अंमलदारांचे पोलीस पथक तयार करुन त्यांना तपासात मार्गदर्शनपर सुचना केल्या.

सदर पथकाने अथक परीश्रम घेवुन गुन्हयाचा तांत्रीक तपास करुन आपले गुप्त बातमीदारांच्या मदतीने अल्प कालावधीत आरोपीचा छडा लावुन आरोपीत क्रिश जितेश संघवी राहणार नवपाडा, डोंबिवली (पुर्व) यास ताब्यात घेवुन त्यांचेकडे कौशल्य पुर्ण तपास केला. आरोपीत क्रिश जितेश संघवी याने गुन्हयाची कबुली देवुन गुन्हयात चोरीस गेलेली **२२ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन** हस्तगत करण्यात आली असुन, गुन्हयांचा पुढील तपास पोउपनिरी/आरमाळकर,मुरबाड पोलीस ठाणे करीत आहे.

मा. श्री डॉ.डी.एस.स्वामी,पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, मा.श्री अनमोल मित्तल, अपर पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण, पोलीस निरीक्षक श्री संदिप गिते, यांचे मार्गदर्शनाखाली पोउनिरी/भाऊ गायकवाड, पोहवा/सतिष कोळी, पोहवा/हेमंत विभुते, पोहवा/दिपक गायकवाड,पोहवा/रविंद्र मोरे या पथकाने कौशल्यपुर्ण अथक परीश्रम घेवुन उल्प कालावधीत गुन्हा उघडकीस आणुन उल्लेखनिय कामगीरी केली आहे.

*****************************************************************


गोपनीय कक्ष
मुरबाड पोलिस ठाणे, मुरबाड
कृपया तुमचा पोलीस स्टेशन भेटीचा अनुभव येथे नोंदवा.